* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र
# आत्ताच एक्सप्रेस
* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २९५ * किंमत - २ रु | RNI.No. MAH/MAR2014/56289 | * शनिवार दि.२८ फेब्रुवारी २०२६ | * पाने-४

# पैनगंगा किनाऱ्यावर सागवान हत्याकांड?

## कोठारी (चि) येथील अवैध वृक्षतोड प्रकरणी वनविभागावर संगनमताचे गंभीर आरोप

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** कोठारी (चि) शिवारातील पैनगंगा नदीकाठ परिसरात सागवान वृक्षांच्या पट्टातोड परवानगीचा उघड दुरुपयोग करून जवळपास सत्तर सागवान झाडांची अवैध तोड करण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. वनविभागाने सर्वेक्षण न करता पट्ट्याबाहेरील झाडांची तोड होऊ दिल्याचा आरोप होत असून, अनेक तक्रारी व निवेदने देऊनही एक महिना उलटला तरी सहाय्यक वनसंरक्षक व वनपरिक्षेत्र अधिकारी कारवाईस टाळाटाळ करत असल्याने संताप उसळला आहे.





निवेदनकर्त्यांनी अधिकाऱ्यांच्या कार्यपद्धतीवर तीव्र नाराजी व्यक्त करत, शासकीय जमिनीवरील लाकूड शासन जमा न करता केवळ दंड आकारून अवैध तोड करणाऱ्याला संरक्षण दिले जात असल्याचा संशय व्यक्त केला आहे. अशा प्रकारे अवैध वृक्षतोडीला मूक संमती दिली जात असेल तर प्रकरण वरिष्ठ पातळीवर नेण्याचा इशाराही देण्यात आला आहे.

**पट्ट्याच्या नावाखाली जंगल संपविण्याचा डाव?**

मालकी पट्ट्यांच्या नावाखाली वनविभाग, वनविकास महामंडळ, महसूल किंवा शासकीय जमिनीवरील जंगल संपत्ती नामशेष करण्याचा प्रकार काही लाकूड व्यावसायिकांकडून सुरू असल्याचे या घटनेवरून स्पष्ट होत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. पट्टा लागून शासकीय जमीन, जंगल किंवा नदी-नाले असल्यास वनविभागाचा सर्वे आवश्यक असतो. त्याशिवाय पट्टातोड परवानगी देणे अशक्य मानले जाते. मात्र किनवट वनविभागाने थेट परवानगी दिल्याची बाब गंभीर प्रश्न निर्माण करणारी आहे.

**सर्वेक्षणाशिवाय तोड सिमांकनच नाही!**

वनविभागाने आधी सिमांकन निश्चित करून सीमारेषा स्पष्ट करणे अपेक्षित होते. परंतु पैनगंगा किनाऱ्यालगतच्या बारमाही प्रवाही पट्ट्यातील शासकीय जमिनीवरील सुमारे सत्तर झाडांची तोड झाल्यानंतरच तक्रारींचा ओघ वाढला. अवैध तोड केलेले लाकूड शासन जमा करावे, ही साधी मागणी असतानाही अधिकारी घटनास्थळी जाण्याची तसदी घेत नसल्याने संशय अधिक गडद झाला आहे.

**लाकूड जप्तीला टाळाटाळ का?**

अवैध तोड केलेले लाकूड शासन जमा करण्यास वनविभाग आढेवेढे घेत असल्याने "तोड करणाऱ्यांच्या बाजूने कौल दिला जातोय का?" असा सवाल नागरिक विचारत आहेत. तात्काळ कठोर कारवाई न झाल्यास प्रधान मुख्य वनसंरक्षकांसह उच्चस्तरीय अधिकाऱ्यांकडे धाव घेण्याचा इशारा देण्यात आला आहे.

**स्थानिक पर्यावरणप्रेमी व शेतकरी यांचे म्हणणे स्पष्ट आहे**

"पैनगंगा किनाऱ्यावरील जंगल संपत्तीची लूट थांबवा; दोषींवर गुन्हे दाखल करून लाकूड शासन जमा करा!"

# खंबाळा ग्रामस्थांच्या पुनर्वसनासाठी उपोषणाला राजकीय पाठबळ; महसूल मंत्र्यांकडून तातडीच्या कार्यवाहीचे आश्वासन

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**


**किनवट –** किनवट तालुक्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पाअंतर्गत खंबाळा येथील ग्रामस्थ व शेतकरी यांनी पुनर्वसनासह विविध प्रलंबित मागण्यांच्या पूर्ततेसाठी १७ फेब्रुवारीपासून साखळी व आमरण उपोषण सुरू केले असून आंदोलन दिवसेंदिवस तीव्र होत आहे. आपल्या कुटुंबियांसह उपोषणस्थळी ठिय्या देत ग्रामस्थांनी न्याय मिळेपर्यंत आंदोलन मागे न घेण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

प्रकल्पग्रस्तांना योग्य पुनर्वसन, जमिनींचे समुचित मोबदले, मूलभूत सुविधा, तसेच पर्यायी शेतीसाठी जमीन उपलब्ध करून देण्याच्या प्रमुख मागण्यांसाठी हे आंदोलन सुरू असल्याचे आंदोलकांनी सांगितले. अनेक वर्षांपासून प्रश्न प्रलंबित असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

या आंदोलनाची दखल घेत २२ फ ेब्रुवारी रोजी भाजपा नांदेड जिल्हा उत्तर महिला आघाडीच्या जिल्हाध्यक्षा सौ. संध्याताई राठोड यांनी उपोषणस्थळी भेट देत आंदोलक ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी महिलांचे, शेतकऱ्यांचे व ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न शांतपणे ऐकून घेतले आणि शासनापर्यंत त्यांच्या न्याय्य मागण्या पोहोचविण्याचे आश्वासन दिले.

यानंतर २७ फेब्रुवारी रोजी सौ. राठोड यांनी राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची प्रत्यक्ष भेट घेऊन खंबाळा ग्रामस्थांच्या पुनर्वसनासह विविध मागण्यांचे निवेदन सादर केले. प्रकल्पग्रस्तांच्या अडचणींची सविस्तर माहिती देत तातडीने निर्णय घेण्याची मागणी करण्यात आली.

यावेळी महसूलमंत्री बावनकुळे यांनी प्रकरण गांभीर्याने घेत संबंधित विभागांना आवश्यक सूचना देऊन मागण्यांवर लवकरात लवकर कार्यवाही करण्याची ग्वाही दिली. शासन स्तरावर सकारात्मक



निर्णय होईल, असे आश्वासन मिळाल्याने आंदोलक ग्रामस्थांमध्ये आशेचे वातावरण निर्माण झाले आहे.

दरम्यान, खंबाळा येथील नागरिकांनी पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लागेपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याचा इशारा दिला असून शासनाने तातडीने ठोस निर्णय घ्यावा, अशी एकमुखी मागणी होत आहे. स्थानिक प्रशासनानेही परिस्थितीवर लक्ष ठेवून शांततेत तोडगा निघावा यासाठी प्रयत्न सुरू केल्याची माहिती मिळते.

# विजय वडेट्टीवारांविरुद्ध हक्कभंग प्रस्ताव, कंबोडिया किडनी प्रकरणावरून भाजप आमदार योगेश सागर आक्रमक

## सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्याने कर्ज फेडण्यासाठी कंबोडियात जाऊन किडनी विकल्याच्या घटनेने राज्य हादरले असतानाच, आता या प्रकरणावरून विधानसभेत राजकीय रणकंदन माजले आहे. काँग्रेस नेते आणि विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी या प्रकरणात चुकीची आकडेवारी देऊन सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप करत, भाजप आमदार योगेश सागर यांनी त्यांच्याविरोधात हक्कभंग प्रस्ताव दाखल केला आहे.

चंद्रपूर जिल्ह्यातील नागभीड तालुक्यातील एका अल्पभूधारक शेतकऱ्याला खाजगी सावकाराने कर्जाच्या जाळ्यात ओढले आणि त्यानंतर त्याला कंबोडियाला नेऊन त्याची किडनी विकायला लावल्याचा धक्कादायक प्रकार दोन महिन्यांपूर्वी समोर आला होता. यासंदर्भात आमदार अतुल भातखळकर यांनी लक्षवेधी सूचना मांडली होती. या चर्चे दरम्यान विजय वडेट्टीवार यांनी दावा केला की, तब्बल १९ शेतकऱ्यांनी अशा प्रकारे आपल्या किडन्या विकल्या आहेत.

भाजप आमदार योगेश सागर यांनी वडेट्टीवारांच्या या दाव्यावर तीव्र आक्षेप घेतला आहे. सागर म्हणाले की, मंत्री महोदयांनी सभागृहात दोनवेळा स्पष्ट केले होते की हा १९ शेतकऱ्यांचा आकडा चुकीचा आहे. कंबोडिया प्रकरणात महाराष्ट्रातील केवळ दोन व्यक्ती होत्या, त्यापैकी दुर्दैवाने एक जण शेतकरी आहे. तरीही वडेट्टीवारांनी वारंवार १९ हा आकडा सांगून एक खोटा नरेटिव्ह सेट करण्याचा प्रयत्न केला.

योगेश सागर यांनी वडेट्टीवारांच्या दुसऱ्या एका विधानावरही बोट ठेवले. वडेट्टीवार म्हणाले होते की, ज्या डॉक्टरांनी हे ऑपरेशन केले ते पद्मश्री विजेते आहेत. यावर उत्तर देताना सागर म्हणाले, संबधित डॉक्टर पद्मश्री नाहीत. अशा प्रकारे चुकीची माहिती पसरवणे हा खऱ्या पद्मश्री विजेत्यांचा आणि या सर्वोच्च नागरी सन्मानाचा अपमान आहे. मंत्र्यांनी वारंवार दुरुस्ती करूनही वडेट्टीवारांनी खोटा आकडा रेटून धरला, ही सभागृहाची दिशाभूल आहे. महाराष्ट्राचा शेतकरी गरीब असेल, संकटात असेल, पण तो किडनी विकणारा नाही. अशा विधानांमुळे शेतकऱ्यांच्या आत्मसन्मानाला ठेच पोहोचली आहे.

# अजित पवारांच्या विमान अपघातामागे काळेबेरे?; राज ठाकरेंचा सरकारवर संशयाचे भूत नाचवण्याचा आरोप

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** अजित पवार यांच्या विमान अपघाताप्रकरणी सरकार एफआयआर दाखल करून घेण्यास घाबरत आहे. त्यामुळे त्यामागे काहीतरी काळेबेरे आहे असा संशय निर्माण होतोय, असे मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शुक्रवारी पत्रकारांशी संवाद साधताना व्यक्त केले. अजित पवारांच्या अपघाताविषयी का नोंदवला जात नाही? या प्रकरणी सरकार का अडथळे आणत आहे? सरकार एका एफआयआरला का घाबरत आहे? अशा विविध प्रश्नांची सरबत्ती राज ठाकरे यांनी या प्रकरणी केली आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी आज मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांची भेट घेतली. त्यानंतर पत्रकारांशी बोलताना राज ठाकरे यांनी सरकारवर उपरोक्त प्रश्नांच्या फैरी झाडल्या. ते म्हणाले, रोहित पवार यांनी आज माझी भेट घेतली. त्यांनी मला अजित पवार यांच्या विमान अपघाताविषयी सर्व तांत्रिक गोष्टी सांगितल्या. मला त्यांच्या सगळ्या बोलण्यातून एक गोष्ट जाणवली. त्यांनी ३ ठिकाणी एफआयआर दाखल करण्याचा प्रयत्न केला. पण तिन्ही ठिकाणी सरकारच्या दबावामुळे एफआयआर नोंदवणून घेण्यात आला नाही. त्यामुळे मला इथेच संशयाची सुई वाटते.

पोलिसांनी एफआयआर नोंदवून घेऊ नये असे सरकारला का वाटत आहे? मरीन ड्राईव्ह पोलिस स्टेशन येथील अधिकारी एफआयआर लिहून घेत होते. पण तो टाईप करत असतानाच डीसीपी आले. त्यांनी एफआयआर लिहू नका असे सांगितले. हे कशासाठी? हा निव्वळ अपघात असेल, तो घातपात नसेल किंवा त्यांच्या कुटुंबीयांना याविषयी काही संशय असेल आणि तपास नीट व्हावा अशी त्यांची इच्छा असेल तर या प्रकरणी एफआयआर दाखल झाला पाहिजे. पण त्यात सरकारकडून अडथळे का आणले जात आहेत? असा प्रश्न राज ठाकरे यांनी उपस्थित केला. अजित पवारांच्या विमान अपघाताविषयी अद्याप एफआयआर का नोंदवला जात नाही? एफआयआर नोंदवण्यासाठी तीन-तीन ठिकाणी प्रयत्न करूनही सरकार त्यात आडकाठी का आणत आहे याचे उत्तर मिळाले पाहिजे. पोलिस अधिकाऱ्यांवर दबाव का आणला जात आहे? सरकारच्या दबावामुळे एफआयआर नोंदवला जात नसेल, तर निश्चितच यामागे काहीतरी काळेबेरे आहे. सरकार एका एफआयआरला का घाबरत आहे? असे विविध प्रश्नही राज ठाकरे यांनी यावेळी उपस्थित केले.

# केजरीवाल, सिसोदिया यांना मद्य घोटाळ्याप्रकरणी क्लीन चीट

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली –** राजधानी दिल्लीत आम आदमी पक्षाचे सरकार असताना उत्पादन शुल्क विभागाच्या मद्य धोरणातून कथित घोटाळा झाल्याचा आरोप होऊन माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, माजी उपमुख्यमंत्री मनीष सिसोदिया यांना कारावास भोगावा लागला होता. शुक्रवारी दिल्लीतील न्यायालयाने आप नेत्यांची निर्दोष मुक्तता केली. "सत्याचा विजय झाला आहे, केजरीवाल, सिसोदिया भ्रष्टाचारी नाहीत, इमानदार आहेत", अशा शब्दात केजरीवाल यांनी निकालाचे स्वागत केले. यावेळी त्यांना अश्रू अनावर झाले

१७ सप्टेंबर २०२४ रोजी भ्रष्टाचार विरोधी मोहिमेचे नेते असलेल्या अरविंद केजरीवाल यांनी मुख्यमंत्रीपदाचा राजीनामा देत धक्कातंत्राचा वापर केला होता. दिल्लीमध्ये विधानसभा निवडणूक काही महिन्यांवर येऊन ठेपली असताना केजरीवाल यांनी ही अग्निपरीक्षा देत असल्याचे म्हटले होते.



कारावासातून बाहेर येताच केजरीवाल यांनी राजीनामा देऊन बाजूला होण्याचा निर्णय घेतला.

मात्र भाजपाने ज्याप्रकारे या प्रकरणात आरोपांची राळ उठवली आणि केजरीवाल व त्यांच्या पक्षाच्या प्रतिमेला डागाळण्याचा प्रयत्न केला, त्याचा परिणाम निवडणुकीत दिसून आला. 'आप' पक्षाला सत्ता गमवावी लागली. तथापि शुक्रवारी 'आप'च्या २३ नेत्यांची उत्पादन शुल्क धोरण प्रकरणात निर्दोष मुक्तता करण्यात आली. यामुळे 'आप'ला मोठा दिलासा मिळाल्याचे बोलले जात आहे. पक्षाचा भ्रष्टाचार विरोधी चेहरा काळवंडत चालला की काय? अशी भीती आता ओसरण्याची चिन्हे दिसत आहेत.

दिल्लीत 'आप'चे सरकार असताना नायब राज्यपाल आणि सरकारमध्ये वारंवार खटके उडालेले पाहायला मिळाले. प्रशासकीय निर्णय मार्गी लावण्यासाठी सरकारला राज्यपालांच्या कार्यालयाचे खेटे मारावे लागत होते. त्यातही उत्पादन शुल्क धोरणामुळे भाजपाने 'आप'च्या नैतिक पायावरच घाला घातला होता. 'आप' पक्ष दिल्लीचा कारभार चालविण्यासाठी सक्षम नाही, हा संदेश यातून दिला गेला.

'आप'च्या ११ वर्षांच्या सत्ताकाळात भाजपा आणि काँग्रेसकडून त्यांच्यावर अनेक आरोप करण्यात आले. शाळेच्या इमारती आणि रुग्णालय बांधकामातील घोटाळ्यांपासून ते पाणीपुरवठा आणि वीज क्षेत्रातील घोटाळ्यांपर्यंतचे आरोप सरकारवर झाले. परंतु उत्पादन शुल्क प्रकरणात केजरीवाल आणि इतर नेत्यांविरोधातील आरोप अधिक तीव्र झाले.

सत्येंद्र जैनपासून ते मनीष सिसोदिया आणि शेवटी अरविंद केजरीवाल यांच्यावर्यंत चौकशीचा फास पोहोचला. केजरीवाल सरकारी निवासस्थानावर कोट्यवधींचा खर्च करून महाल उभारल्याची टीका झाली. उत्पादन शुल्क धोरणातून 'आप'ला आर्थिक लाभ झाला आणि त्यातील पैसा इतर राज्यांच्या निवडणुकांसाठी वापरला गेला, असाही आरोप करण्यात आला. यामुळे 'आप'पक्षावर एकामागून एक संकटे कोसळली.

## दिल्लीत आता निवडणूक घ्या, भाजपाच्या १० पेक्षा अधिक जागा निवडून आल्या तर मी राजकारण सोडेन-केजरीवाल

दिल्लीतील कथित मद्य घोटाळा प्रकरणात न्यायालयाने निर्दोष मुक्तता केल्यानंतर आज सायंकाळी अरविंद केजरीवाल यांनी पत्रकार परिषद घेत थेट भाजपाला खुलं आव्हान दिलं. 'दिल्लीत आता निवडणूक घ्या, भाजपाच्या १० पेक्षा अधिक जागा निवडून आल्या तर मी राजकारण सोडेन', असं अरविंद केजरीवाल यांनी म्हटलं आहे.

माजी मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यावर जोरदार टीका केली. केजरीवाल यांनी म्हटलं की, "दिल्लीत भाजपा सत्तेत आल्यापासून दिल्लीकरांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे. संपूर्ण दिल्ली उद्ध्वस्त झाली आहे. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांच्या सत्तेच्या लालसेचे परिणाम दिल्लीतील तीन कोटी जनतेला भोगावे लागत आहेत. दिल्लीतील लोकांना जाऊन विचारा. आज मी मोदींना आव्हान देतो, जर तुमच्यात हिंमत असेल तर दिल्लीत पुन्हा निवडणुका घ्या. तुम्हाला १० पेक्षा जास्त जागा मिळाल्या तर मी राजकारण सोडेन. दिल्लीतील लोक तुम्हाला कंटाळले आहेत", अशा शब्दांत केजरीवालांनी भाजपावर टीका केली.

"दिल्लीतील कथित मद्य घोटाळा प्रकरणाचा हा खटला सर्वात मोठा राजकीय कट होता. जो दिल्लीतील आम आदमी पक्षाला सत्तेवरून हटवण्यासाठी भाजपाने रचला होता. पंतप्रधान मोदी आणि अमित शाह यांनी आम आदमी पक्षाला संपवण्यासाठी आणि पक्षाला बदनाम करण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्यांनी आम आदमी पक्षाला संपवण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा देशाच्या हितासाठी काम करावं. सत्तेसाठी कोणीही देश आणि संविधानाशी अशा प्रकारे खेळू नये. पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशाची माफी मागितली पाहिजे", असंही केजरीवाल म्हणाले आहेत.

# गलगोटियाज घडते, कारण...

कृत्रिम बुद्धिमत्तेच्या काळात जर आपली तरुण पिढी संकुचित वादात, विद्वेषात अडकून पडली, तर आपण केवळ दुसऱ्या देशांनी शोधलेल्या तंत्रज्ञानाचे 'वापरकर्ते' बनून राहू, 'निर्माते' कधीच होऊ शकणार नाही. पलीकडे गलगोटियाज विद्यापीठासंदर्भात सुरू झालेला वाद देशभर चर्चेत आला, पण वस्तुस्थिती अशी आहे की ही समस्या एखाद्या एका संस्थेपुरती मर्यादित नाही. आपल्या समाजात सर्वसाधारणपणे कल्पकता, संशोधन आणि स्वतंत्र विचारांपेक्षा धार्मिक, जातीय किंवा भावनिक मुद्द्यांना अधिक प्राधान्य दिले जाते. या वातावरणाचा सर्वात मोठा फटका बसतो तो आपल्या तरुण पिढीला आणि परिणामी देशाच्या भविष्यातील नवकल्पनांना. कोणत्याही व्यक्ती, धर्म किंवा जातीबद्दल द्वेष बाळगणे म्हणजे आपल्या विचार विश्वावर आपणच मर्यादा घालणे होय. द्वेष माणसाला एका चौकटीत अडकवतो. तो 'मी बरोबर आणि तो चूक' या दोनच रंगांत जग पाहू लागतो. पण कल्पकता ही नेहमी करड्या छटांमध्ये, प्रश्नांमध्ये आणि शक्यतांमध्ये फुलते. जिथे प्रश्न विचारण्याची, वेगळं पाहण्याची मोकळीकच नाही, तिथे संशोधन कसं उभं राहणार? मानसशास्त्र सांगते की जेव्हा माणूस राग, भीती किंवा द्वेष या भावनांमध्ये अडकतो, तेव्हा मेंदूचा विचार करणारा भाग कमी सक्रिय होतो आणि भावनिक भाग अधिक सक्रिय होतो. अशा अवस्थेत तर्कशक्ती, सर्जनशीलता आणि नवीन कल्पना सुचण्याची क्षमता कमी होते. म्हणजेच द्वेष ही भावना केवळ सामाजिकदृष्ट्या नाही तर बौद्धिकदृष्ट्याही घातक आहे. ओशो म्हणतात, 'जेव्हा तुम्ही कुणाबद्दल द्वेष करता, त्या द्वेषाची बीजे प्रथम तुमच्याच डोक्यात पडलेली असतात.' मुलं मोठ्यांचे बोलणे ऐकूनच शिकतात. घरात जर सतत एखाद्या धर्माबद्दल, जातीबद्दल नकारात्मक चर्चा होत असेल, तर मुलांच्या मनात नकळत पूर्वग्रह तयार होतात. हे पूर्वग्रह म्हणजे विचारांवर बसलेले अदृश्य चष्मे. त्यातून मुलं जग पाहू लागतात. पण ते जग पूर्ण नसतं, ते मर्यादित आणि रंगवलेलं असतं. ज्या भूमीवर द्वेषाची बीजे पेरली जातात, तिथे मन संकुचित होतं. द्वेष माणसाला 'स्वतः चे' आणि 'परके' अशा गटांत विभागायला शिकवतो, पण कल्पकता ही विभागणी मानत नाही. ती प्रत्येक गोष्टीकडे उघड्या मनाने पाहते. जर मन आधीच ठरवून बसलं असेल की 'ही गोष्ट चुकीचीच आहे' किंवा 'ही माणसं वाईटच आहेत', तर त्या संदर्भात नवीन विचार जन्मालाच येत नाहीत. कल्पकता विकसित होण्यासाठी आवश्यक असतं उत्सुक मन जे प्रश्न विचारतं, शोध घेतं, वेगळेपणातही सौंदर्य पाहतं. पण द्वेष मनात भीती आणि राग निर्माण करतो. भीतीमुळे माणूस नवीन गोष्टींपासून दूर राहतो. रागामुळे तो समोरच्याचं म्हणणं ऐकायलाही तयार नसतो. अशा अवस्थेत संवाद थांबतो, आणि संवाद थांबला की नवकल्पनांचं दार बंद होतं. याउलट, आनंदी आणि सकारात्मक मन प्रत्येक गोष्टीत काहीतरी शिकण्याची संधी शोधतं. ते वेगवेगळ्या मतांमध्येही अर्थ शोधतं. अशा मनातूनच नवे शोध, नवे प्रयोग आणि नवे विचार जन्म घेतात. इतिहास पाहिला तर महान शोध आणि नवकल्पना या विविध संस्कृती, विचारधारा आणि पार्श्वभूमी असलेल्या लोकांच्या सहकार्याने घडलेल्या दिसतात. विज्ञानाला धर्म, जात, भाषा यांची सीमा नसते. आपण तरुणांना 'तो वेगळा आहे म्हणून चुकीचा आहे,' असे शिकवले, तर ते कधीच वेगळ्या विचारांशी संवाद साधणार नाहीत. आणि संवादाशिवाय कल्पकता, नवकल्पना अशक्य आहे. आज जगात संशोधन हे समूहकार्याने होते. शाळा असो, महाविद्यालय असो वा जागतिक प्रयोगशाळा, विविध प्रकल्प हे समूहाने, विचारांची देवाण घेवाण करून पूर्णत्वास नेले जातात, पण जर आपली मानसिकता द्वेष, भेदभाव आणि वर्चस्व याभोवती फिरत असेल, तर आपण सहकार्य कसे शिकणार? सहकार्याशिवाय आधुनिक संशोधन अशक्य आहे. जेव्हा तरुणाईला धार्मिक किंवा जातीय रंगात अडकवले जाते, तेव्हा त्यांची ऊर्जा विधायक कामाऐवजी संघर्षात खर्च होते. ज्या वयात नवीन प्रयोग, स्टार्टअप्स, संशोधन, पेटंट्स यांचा विचार व्हायला हवा, त्या वयात जर चर्चा द्वेषाच्या भोवती फिरत असेल, तर देशाची बौद्धिक प्रगती थांबते. द्वेषप्रधान वातावरणात प्रश्न विचारणाऱ्याला विरोधक समजले जाते. पण विज्ञानाची सुरुवातच प्रश्नांपासून होते. 'का?' आणि 'कसे?' हे प्रश्न विचारू दिले नाहीत, तर संशोधन कसे घडणार? त्यामुळे मुक्त आणि सुरक्षित वातावरण निर्माण करणे अत्यावश्यक आहे.कल्पकता ही खुल्या मनात फुलते. जिथे प्रेम, सद्भावना आणि परस्पर आदर असतो, तिथे माणूस निर्भयपणे विचार मांडतो. चुका करण्याची भीती नसते. आणि चुका न करता कोणीही शोध लावलेला नाही. म्हणून जर आपण खरोखर संशोधनवृत्ती वाढवायची असेल, तर प्रथम द्वेषमुक्त वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. जेव्हा आपण एखाद्या विशिष्ट विचारधारेच्या किंवा द्वेषाच्या प्रभावाखाली असतो, तेव्हा आपण नकळतपणे 'कन्फर्मेशन बायस' चे बळी ठरतो. म्हणजे, आपल्याला फक्त तेच सत्य वाटते जे आपल्या पूर्वग्रहांना पुष्टी देते. त्यात भरीस भर म्हणजे समाज माध्यमे! समाज माध्यमांच्या प्रत्येक प्लॅटफॉर्मवर समविचारी लोकांचे गट तयार होऊन केवळ त्याच प्रकारची विचारधारा असलेल्या माहितीचे आदान प्रदान केले जाते, त्याच गोष्टींचे उदात्तीकरण केले जाते. यामध्ये एआयच्या मदतीने हवे तसे चित्रं, व्हिडिओ बनवून 'ब्रेन वॉश' करून 'आपल्याकडे' वळविण्याचे, टिकवण्याचे कामही सुरू असते. या गोष्टींना व्यक्ती लागलीच बळी पडते, कारण कट्टरता डोक्यात असलेली व्यक्ती सारासार विचार करण्याची क्षमता गमावून बसते. शहानिशा न करता चटकन एखाद्या गोष्टीवर विश्वास ठेवते. यामुळे द्वेष, कट्टरता अधिकाधिक टोकदार होत जाते. याशिवाय वापरकर्त्या व्यक्तीला जी विचारधारा आवडते तीच माहिती समाज माध्यमांद्वारे सतत त्या व्यक्तीच्या पुढ्यात ओतली जाते. त्यातून हे विचार हेच अंतिम सत्य अशी धारणा बनते. यामुळे भिन्न मतांविषयी असहिष्णुता वाढते. विज्ञान, नवकल्पना वा कल्पकता या भिन्न मतांच्या संघर्षातूनच पुढे येतात. त्यामुळे विविध विचारांना स्वीकारण्याची सहिष्णुता वाढणे गरजेचे आहे. मतभेदांना शत्रुत्व न मानता त्यातून शिकण्याची वृत्ती विकसित करणे आवश्यक आहे. संशोधनासाठी लागणारी 'वस्तुनिष्ठता' विकसित करणे आवश्यक आहे. कल्पकता ही एखाद्या स्वच्छ काचेसारखी असते, पण त्यावर जर द्वेषाचे धुके साचले, तर पलीकडचे जग स्पष्ट दिसत नाही. आपण तंत्रज्ञानाच्या युगात आहोत, जिथे 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स'सारखी क्षेत्रे झपाट्याने वाढत आहेत. अशा काळात जर आपली तरुण पिढी संकुचित वादात, विद्वेषात अडकून पडली, तर आपण केवळ दुसऱ्या देशांनी शोधलेल्या तंत्रज्ञानाचे 'वापरकर्ते' बनून राहू, 'निर्माते' कधीच होऊ शकणार नाही. म्हणूनच, द्वेष ही केवळ सामाजिक समस्या नाही; ती बौद्धिक प्रगतीचीही शत्रू आहे. ती मनाला बंद करते, विचारांना कुंठित करते आणि नवकल्पनांना गुदमरवते. जर आपल्याला उद्याची पिढी कल्पक, संशोधक आणि जागतिक स्तरावर स्पर्धा करणारी घडवायची असेल, तर प्रेम, सहिष्णुता आणि वैज्ञानिक दृष्टिकोन यांना प्राधान्य द्यावे लागेल.

# अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांचा समृद्ध वारसा पुढे चालू ठेवणारे खंबीर नेतृत्व : सचिन भाऊ साठे

**साहित्याचं सृजन सामाजिक भान, जाण देऊन जाते. आपल्या आजोबांनी म्हणजेच साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांनी आपल्या प्रज्ञा आणि प्रतिभेच्या जोरावर प्रचंड साहित्य निर्मिती करून समाजमन जागृत करण्याचं मोठं काम अण्णा भाऊ आणि शंकर भाऊंनी केलं आहे. तोच वसा आणि वारसा समृद्ध करत आज महाराष्ट्रासह इतर राज्यांमध्ये त्यांचे नातू आणि अण्णा भाऊ साठे क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन भाऊ साठे हे अत्यंत निष्ठेने काम करत आहेत. याचा आम्हाला अभिमान वाटतो. आज सचिन भाऊ साठे यांचा वाढदिवस. वाढदिवसाच्या निमित्ताने त्यांच्या कार्यकर्तृत्वाचा आढावा घेणारा हा लेख...**

**संपादक..**



शब्दांना अनुभवाची धार आणि प्रतिभेचे तेजस्वीपण लाभले की अस्सल साहित्याचा जन्म होतो. अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या साहित्याला हेच वास्तवाचे अधिष्ठान प्राप्त झाले होते. जगलेल्या दाहक जीवनाची विदारक अनुभूती शब्दा शब्दांतून पुल्लिंगासारखी प्रज्वलित होते आणि अंधारलेले मनाचे कोपरे प्रकाशमान व्हायला लागतात.दुःख दैण्याच्या अंधारात चाचपडणारा मानवी समूह हा अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे त्यांच्या अस्थेचा विषय होता. आणि त्यातूनच अस्सल साहित्याची निर्मिती होत गेली .एका कामगारानेच कामगारावर लिहावं ही अस्सल साहित्याची बीजं अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या साहित्यात ठायी ठायी दिसायला लागतात. सुख वैभवच्या रुपेरी महालात बसून लिहिलेले तथाकथित मराठी साहित्य काळजाचा ठाव कधीच घेऊ शकले नाहीत. साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या साहित्याचं मराठी साहित्य विश्वातील पदार्पण म्हणजे खेडी-पाडी,वाडी- तांडे यातून दुःख, दैन्य, दारिद्र्य सोसणाऱ्या सामान्य माणसाच्या नायकत्वाचा उदय होता. विसाव्या शतकातील दोन सामर्थशाली लेखक म्हणजे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे हे होत. फारसे आयुष्यमान न लाभलेल्या या दोन्हीही प्रतिभा संपन्न साहित्यिकांनी कथा, कादंबरी, नाटक, लोकनाट्य, प्रवासवर्णन ,पोवाडा, लावणी असे विविधांगी वाङ्मय प्रकार हाताळून अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांनी मराठी साहित्यातील आपले कर्तृत्व सिद्ध केले आहे. त्यांच्या विविधांगी साहित्य प्रकारावर आज महाराष्ट्रभर आणि देशात संशोधन होताना दिसते. ही अत्यंत गौरवाची आणि अभिमानाची बाब म्हणावी लागेल.

केवळ मनोरंजनासाठी साहित्याचं सृजन करावे हा विचार अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या मनाला स्पर्श करणारा नव्हता. सामाजिक परिवर्तनाचा क्रांतिकारी एल्गार हाती घेऊन इथल्या व्यवस्थेला अंतर्बाह्य परिवर्तन साकार करणे हेच अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या साहित्याचे प्रधान मूल्य होते. भारतीय संविधानामध्ये न्याय, स्वातंत्र्य, समता, बंधुता, धर्मनिरपेक्षता आणि मनुष्यता ही मूल्ये दिसून येतात. अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या साहित्यात भारतीय संविधानिक मुल्यांचे दर्शन ठायी ठायी दिसून येते. अण्णा भाऊ साठे आणि शंकर भाऊ साठे यांच्या साहित्यातील ही मुले कायम आपल्या जीवनात आणि संघटनात्मक पातळीवर आणि समाजामध्ये रुजावीत यासाठी अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सचिन भाऊ साठे हे महाराष्ट्रभर रात्रीचा दिवस करत समाजाच्या उत्थानासाठी, उद्धारासाठी, परिवर्तनासाठी आणि प्रबोधनासाठी आपली लेखणी आणि वाणी झिजवीत आहेत.याचा आम्हाला मनस्वी आनंद आहे.

सांगली जिल्ह्यातील वाळवा तालुक्यातील वाटेगाव नावाच्या निवडुंगाच्या जंगलात वाढलेल्या कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वाने वाटेगाव या मातीचा सुगंध राज्य, देश आणि विदेशात सुगंधित केला आहे. त्यात अण्णा भाऊ साठे, शंकर भाऊ साठे, राघोजी साठे, फकिरा, विष्णुपंत कुलकर्णी आणि शंकर पाटील या कर्तृत्वान आणि नेतृत्ववान व्यक्तिमत्त्वाने आपल्या व्यक्तिमत्त्वाच्या पाऊल खुणा समृद्ध केल्या आहेत. तोच वसा आणि वारसा आज महाराष्ट्राच्या समाजकारणात आणि राजकारणात सचिन भाऊ साठे हे सिद्ध करत आहेत. २८ फेब्रुवारी १९८६ साली वाटेगाव च्या पवित्र क्रांती भूमीत सचिन भाऊ साठे यांचा जन्म झाला. आपले मोठे आजोबा म्हणजेच अण्णा भाऊ साठे यांच्या निधनानंतर १९९६ आजोबा शंकर भाऊ साठे यांचे निधन झाले. वडील संजय भाऊ साठे आणि आई गीताबाई आणि चुलत्या सावित्रीमाई साठे यांच्या संस्कारात सचिन भाऊ साठे वाढत गेले. वडील संजय भाऊ साठे यांचे अकाली म्हणजेच १९९३ साली निधन झाले. त्याच साली म्हणजे १९९३ सालीच सचिन भाऊ साठे यांचे छोटे बंधू पंकज यांचेही निधन झाले.सचिन भाऊ साठे यांनी इयत्ता पहिली आणि दुसरीचे शिक्षण वाटेगाव येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत पूर्ण केल्यानंतर गीताबाई साठे यांनी कोल्हापूर जिल्ह्यातील पन्हाळा तालुक्यातील कोंडोली या आपल्या माहेरी काही काळ वास्तव्यास राहिल्या. त्याचवेळी सचिन भाऊ साठे यांनी आपल्या आजोळी तिसरी आणि चौथीपर्यंतचे शिक्षण पूर्ण करून पुन्हा पाचवीपासून पुढचे शिक्षण सचिन भाऊ साठे यांनी वाटेगाव मध्ये पूर्ण केले.

मधुकर अण्णा भाऊ साठे आणि संजय शंकर भाऊ साठे यांचे निधन झाल्यानंतर घरात एकही कर्ता पुरुष नसतानाही माई सावित्रीबाई साठे आणि माई गिताबाई साठे यांनी आपल्या चिमुकल्या लेकरांना म्हणजेच दिपालीताई, सुवर्णाताई, ज्योतीताई, आरती ताई आणि सचिन भाऊ यांना या लेकरांना तळ हाताच्या फोडासारखं जपत सांभाळत अण्णा भाऊ आणि शंकर भाऊ यांच्या कर्तृत्वाचा समृद्ध वारसा या दोन्हीही माऊलींनी अत्यंत समर्थपणे सिद्ध केला आहे. या काळात या परिवाराने सोसलेले आणि भोगलेले अनेक बरे वाईट प्रसंग वाट्याला आले असतानाही कधीच न खचता, न घाबरता अत्यंत समर्थपणे या दोन्हीही माऊलींनी महाराष्ट्रातील येणा-या जाणाऱ्यांची काळजी अगदी जीवापाड जपली आहे. सावित्रीबाई साठे आणि सचिन भाऊ साठे अण्णाभाऊंचा वारसा समर्थपणे पुढे चालवत महाराष्ट्र पालथा घालत आहे.

समाजाच्या उन्नतीचे काम करत असताना पोटापाण्याचे प्रश्न सुटणार नाहीत कुठेतरी कायमस्वरूपी नोकरी असावी हा विचार महाराष्ट्रातील काही विचारवंतांच्या मनात आला आणि अण्णाभाऊंचे वारसदार म्हणून सचिन भाऊ साठे यांना बीड येथील बलभीम महाविद्यालयात नोकरीसाठी आपला शब्द खर्ची केला आणि सचिन भाऊंना एकदाची नोकरी मिळाली. समाजाविषयीची प्रचंड ओढ आणि समाजाच्या उत्थानाचा विचार कायम सचिन भाऊ साठे यांच्या मनात रुंजी घालत असायचा. नोकरी सांभाळून समाजाच्या उत्थानाचे काम करता येणार नाही ही बाब लक्षात आल्यानंतर सचिन भाऊ साठे यांनी नोकरीचा त्याग केला.


पुढे २०१७ साली त्यांनी महाराष्ट्रातील काही विचारवंतांना सोबत घेऊन मानव हित लोकशाही पक्षाची स्थापना केली. परंतु राजकीय महत्त्वकांक्षा आणि समाजाच्या उत्थानाचा विचार करत त्यांनी पुढे २०२३ सालापासून सचिन भाऊ साठे आणि गणेश भाऊ भगत आणि महाराष्ट्रातील काही विचारवंतांनी मिळून पुन्हा एकदा अण्णा भाऊ साठे क्रांती सेना या नावाने आपले संघटन सुरू करून महाराष्ट्राच्या समाजकारणात आणि राजकारणात सचिन भाऊ साठे यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली आहे. आज घडीला महाराष्ट्रातील २२-२३ जिल्ह्यांमध्ये अण्णा भाऊ साठे क्रांती सेनेच्या क्रियाशील कार्यकर्त्यांच्या निष्ठेवर संघटन चालू असून महाराष्ट्रातील कानाकोपऱ्यात होणाऱ्या अन्याय अत्याचाराच्या विरुद्ध बंड पुकारून अन्यायग्रस्त समाज बांधवांना न्याय मिळवून देण्यासाठी सचिन भाऊ साठे हे रात्रीचा दिवस करून महाराष्ट्रासह अनेक राज्यात आज फिरताना दिसत आहेत. अण्णा भाऊ साठे क्रांती सेना महाराष्ट्र सह तेलंगणा, कर्नाटक आणि मध्य प्रदेशामध्ये या संघटनेचे जाळे सर्वदूर पसरलेले आहेत. हे सगळं करत असताना सचिन भाऊ साठे यांच्या अर्धांगिनी एडवोकेट मीराताई सचिन साठे यांची त्यांना मिळालेली खंबीर साथ हे सचिन भाऊंच्या आजच्या धडपडीचे यश म्हणावे लागेल. सचिन भाऊंचे कन्या मुक्ता उर्फ राजनंदिनी आणि चिरंजीव प्रसेनजीत या दोन्हीही चिमुकल्यांना शिक्षण आणि संस्कार अडवोकेट मीराताई आपला वकिलीचा व्यवसाय सांभाळत या लेकरांच्या शिक्षणाची आणि संस्काराची काळजी वाहत आहेत.

अण्णा भाऊ साठे क्रांती सेना म्हणजे केवळ संघटन नसून ते एक कुटुंब या भावनेने क्रांतीसेनेत काम करणारे सर्व झुंजार कार्यकर्ते आज महाराष्ट्रभर समाजाच्या उन्नतीचा आणि उत्थानाचा विचार करत अत्यंत निष्ठेने काम करत आहेत. सचिन भाऊ साठे यांच्या कार्यकर्तृत्वाची दखलही महाराष्ट्र शासनाने घेतले असून. ते सध्या साहित्यरत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र साधने प्रकाशन समितीचे सन्माननीय सदस्य म्हणूनही काम करत आहेत. महाराष्ट्रातील २२-२३ जिल्ह्यांमधील कार्यकर्ते आपल्या लाडक्या सचिन भाऊंच्या आदेशाची आणि त्यांच्या नावीन्यपूर्ण समाज उपयोगी उपक्रमाची अंमलबजावणी करण्यासाठी त्यांचा आदेश मानून आज काम करत धडपडत आहेत.

नांदेड जिल्ह्याचे क्रियाशील जिल्हाध्यक्ष पंडित वाघमारे यांच्या नेतृत्वाखाली दिनांक २८ फेब्रुवारी २०२६ रोजी देवकृपा लॉन्स नांदेड येथे सचिन भाऊ साठे यांच्या वाढदिवसाचे आणि राज्यस्तरीय बैठकीचे आयोजन करून त्यांचा आगळावेगळा वाढदिवस साजरा करत आहेत. सचिन भाऊ साठे यांना वाढदिवसाच्या निमित्ताने खूप खूप शुभेच्छा....

**- शिवा कांबळे**
राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त शिक्षक,
नांदेड

# सत्संग : अंतर्मुखतेकडून आत्मोन्नतीकडे




मानवी जीवन हे केवळ भौतिक गरजांच्या पूर्ततेपुरते मर्यादित नसून ते विचार, मूल्ये, भावना आणि आत्मिक शोध यांचा संगम आहे. माणूस जसा बाह्य जगात प्रगती करतो, तसाच त्याचा अंतर्गत विकास होणेही तितकेच आवश्यक असते. या अंतर्गत विकासाच्या प्रक्रियेत सत्संग ही संकल्पना अत्यंत महत्त्वाची ठरते. 'सत' म्हणजे सत्य, सद्गुण, शाश्वत मूल्ये आणि 'संग' म्हणजे सहवास. म्हणजेच सत्याचा, सद्विचारांचा आणि सद्गुणांचा सहवास म्हणजे सत्संग.

भारतीय तत्त्वज्ञानात सत्संगाला अनन्यसाधारण महत्त्व दिले गेले आहे. उपनिषदांपासून संतपरंपरेपर्यंत सर्वत्र सत्संगाचे महत्त्व अधोरेखित केलेले दिसते. ''सत्संगती सदा घडो'' ही संतांची प्रार्थना केवळ धार्मिक भावनेतून आलेली नसून ती मानवी जीवनाच्या मानसिक व नैतिक उन्नतीशी जोडलेली आहे. कारण माणसाचे विचार, सवयी आणि आचार हे त्याच्या संगतीवर मोठ्या प्रमाणात अवलंबून असतात.

सत्संग म्हणजे केवळ एखाद्या प्रवचनाला बसणे किंवा धार्मिक ग्रंथांचे पठण करणे इतकाच संकुचित अर्थ नाही. खरा सत्संग हा अंतःकरणाला स्पर्श करणारा, विचारांना चालना देणारा आणि जीवनदृष्टी व्यापक करणारा असतो. जिथे अहंकाराला मुरड घातली जाते, तिथे विवेक जागृत होतो; जिथे स्पर्धा कमी होते, तिथे करुणा वाढते; आणि जिथे स्वार्थ कमी होतो, तिथे परमार्थाची जाणीव निर्माण होतेहा सारा प्रवास सत्संगातून घडतो.

आजच्या वेगवान आणि स्पर्धात्मक जीवनात माणूस सतत बाह्य यशामागे धावतो. पैसा, पद, प्रतिष्ठा यांचा पाठलाग करताना अंतःशांती हरवते. अशा वेळी सत्संग हा एक थांबा ठरतोजिथे माणूस स्वतःकडे पाहू शकतो. सत्संग माणसाला प्रश्न विचारायला शिकवतो: आपण जे करतो आहोत, ते का करतो आहोत? आपले ध्येय केवळ भौतिक आहे की त्यामागे मूल्यांची बैठक आहे? या प्रश्नांची उत्तरे शोधण्याची प्रक्रिया म्हणजेच सत्संगाचा गाभा.

संतपरंपरेत सत्संगाचे स्वरूप अधिक लोकाभिमुख आणि अनुभवाधिष्ठित होते. संत ज्ञानेश्वर, तुकाराम, नामदेव, एकनाथ यांसारख्या संतांनी सत्संगाला केवळ तत्वज्ञानापुरते न ठेवता जीवनाशी जोडले. अभंग, ओवी, कीर्तन, भजन यांच्या माध्यमातून त्यांनी सामान्य माणसाच्या जीवनात आत्मिक प्रकाश आणण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या सत्संगातून आत्मज्ञानाबरोबरच सामाजिक समतेची, करुणेची आणि मानवतेची शिकवण मिळते.

सत्संगाचा प्रभाव व्यक्तीपुरता मर्यादित राहत नाही; तो समाजजीवनावरही परिणाम करतो. जेव्हा समाजात सत्संगाची परंपरा मजबूत असते, तेव्हा तिथे नैतिकता, परस्परविश्वास आणि सहअस्तित्वाची भावना वाढते. सत्संगातून व्यक्तीला 'मी'पणातून 'आपण'पणाकडे नेण्याची शक्ती मिळते. त्यामुळे समाजात तणाव, हिंसा आणि दुरावा कमी होण्यास मदत होते.

मात्र आधुनिक काळात सत्संगाच्या स्वरूपातही बदल होत आहेत. काही वेळा सत्संग हा केवळ औपचारिक कार्यक्रम बनतोऐकणे कमी आणि दाखवणे जास्त, अंतर्मुखता कमी आणि बाह्य आडंबर अधिक. अशा वेळी सत्संगाचा मूळ उद्देश हरवण्याचा धोका असतो. सत्संग म्हणजे परिवर्तन; केवळ करमणूक किंवा सवयीचा भाग नव्हे. जर सत्संगातून ऐकलेले विचार जीवनात उतरले नाहीत, तर तो केवळ शब्दांचा खेळ ठरतो.

खरा सत्संग तोच, जो माणसाच्या आचरणात बदल घडवतो. राग कमी होणे, संयम वाढणे, दुसऱ्याच्या दुःखाबद्दल संवेदनशीलता निर्माण होणे, स्वार्थाऐवजी कर्तव्याची जाणीव वाढणेहे बदल जर घडत असतील, तर सत्संग सफल झाला असे म्हणता येईल. सत्संग हा आत्मपरीक्षणाची प्रक्रिया आहे; ती कधी सुखद, कधी अस्वस्थ करणारीही असू शकते. पण ही अस्वस्थताच माणसाला अधिक प्रगल्भ बनवते. आज तंत्रज्ञानामुळे सत्संगाचे माध्यमही विस्तारले आहे. ऑनलाइन प्रवचने, चर्चासत्रे, ग्रंथवाचन गट यांमुळे सत्संग घराघरांत पोहोचत आहे. ही संधी निश्चितच सकारात्मक आहे; मात्र प्रत्यक्ष सहवासाची उब, संवादातील सजीवता आणि अनुभवांची देवाणघेवाण यांची जागा तंत्रज्ञान पूर्णपणे घेऊ शकत नाही. त्यामुळे आधुनिक साधनांचा उपयोग करताना सत्संगाच्या आत्म्याला जपणे आवश्यक आहे.

शेवटी, सत्संग म्हणजे स्वतःला अधिक चांगले समजून घेण्याचा, स्वतःला घडवण्याचा आणि समाजाशी अधिक समरस होण्याचा मार्ग आहे. तो धर्माच्या चौकटीत अडकलेला नसून तो जीवनदृष्टीशी निगडित आहे. सत्य, करुणा, विवेक आणि प्रेमया मूल्यांचा संग म्हणजेच सत्संग. अशा संगतीतून माणूस केवळ शांत होत नाही, तर अधिक जबाबदार, अधिक संवेदनशील आणि अधिक माणूस बनतो. म्हणूनच सत्संग हा जीवनाचा अलंकार नसून तो जीवनाला अर्थ देणारा आधार आहे.

**- प्राची परचुरे वैद्य**

# मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधीतून सय्यद युनूस यांना जीवनदायी मदत

*** उपचारांना मिळाली नवी दिशा**
*** ७३ रुग्णांना ९७ लाख रुपयांची मदत**

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यातील वसमत तालुक्यातील कुरुंदा येथील सय्यद युनूस हे मजुरी करून आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत दिवसेंदिवस कष्ट करत कुटुंबाची जबाबदारी पार पाडत असताना त्यांना अचानक मेंदूविकाराचा गंभीर आजार झाला आणि कुटुंबासमोर मोठे आर्थिक संकट उभे राहिले होते.

घरची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने महागड्या उपचारांचा खर्च उचलणे कुटुंबासाठी अशक्य झाले होते. अशा कठीण प्रसंगी महाराष्ट्र शासनाच्या मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी अंतर्गत त्यांना एक लाख रुपये इतकी आर्थिक मदत मंजूर करण्यात आली. ही रक्कम थेट रुग्णालयात जमा झाल्यामुळे त्यांच्या उपचारांना तात्काळ गती मिळाली.

या मदतीमुळे सय्यद युनूस व त्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला. ''अचानक आलेल्या आजारामुळे आम्ही पूर्णपणे खचून गेलो होतो; मात्र शासनाच्या मदतीमुळे आम्हाला नव्याने आशा मिळाली,'' अशी भावना श्री. सय्यद यांच्या कुटुंबीयांनी व्यक्त केली.

या सहाय्याबद्दल सय्यद युनूस सय्यद हमीद व त्यांच्या कुटुंबीयांनी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच मुख्यमंत्री सहायता निधी कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांचे मनःपूर्वक आभार मानले.



मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी ही योजना गरजू रुग्णांसाठी संजीवनी ठरत असून, आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना मोठा आधार देत आहे. हिंगोली जिल्ह्यात मुख्यमंत्री सहायता कक्षाच्या माध्यमातून आतापर्यंत ७३ रुग्णांना एकूण ५६ लाख ९५ हजार रुपयांची आर्थिक मदत मंजूर करण्यात आली आहे.


गंभीर आजारांवरील उपचारांसाठी मोठा खर्च होत असल्याने अनेक कुटुंबांवर आर्थिक संकट ओढवते. अशा परिस्थितीत या निधीतून मिळणारी मदत रुग्ण व त्यांच्या कुटुंबीयांसाठी दिलासा देणारी ठरत आहे.

मुख्यमंत्री सहायता कक्ष, हिंगोली यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे गरजू रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य उपलब्ध होत असून नागरिकांमध्ये समाधानाची भावना व्यक्त होत आहे. गरजू नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन मुख्यमंत्री वैद्यकीय सहायता निधी कक्षाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. सचिन भोसले यांनी केले आहे.

# मा. बाळासाहेब ठाकरे हरिद्रा हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्रातर्फे हळद सेलम वान लावणाऱ्या शेतकऱ्यासोबत ऑनलाइन चर्चा

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** मा बाळासाहेब ठाकरे हरिद्रा हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्र वसमत येथून हळदीच्या सेलम वाणासह इतर काही वाणाची खरेदी करून खरीप हंगाम २०२४ व २०२५ मध्ये लागवड केलेल्या शेतकऱ्यांच्या हळद पिकांबाबत सद्यस्थिती काय आहे याबाबत आनलाईन चर्चासत्र आयोजित करण्यात आले होते.



यावेळी चर्चा करताना अनेक शेतकऱ्यांनी संशोधन केंद्राचे सन्माननीय अध्यक्ष कॅबिनेट दर्जा प्राप्त मंत्री नामदार श्री हेमंत पाटील यांच्या सहकार्याने भारतातील विविध राज्यातील चांगले वाण शेतकऱ्यांना सहज व अल्पदरात उपलब्ध झाल्याचे सांगितले.

यावेळी व्यवस्थापकीय संचालक प्रदीप कच्छवे यांनी प्रास्ताविक करत शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. प्रगतीशील शेतकरी संजय भोसले, रा. आंबा; शशांक पतंगे रा. कांडली, राजेश रामनगीरे, दिनेश तावडे रा. तळणी यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी सहभागी होऊन संशोधन केंद्रावरील बेण्यापासून लागवड केलेल्या हळदीचे पीक यावर्षीच्या प्रतिकुल परिस्थितीतीतही चांगले आले. त्यावर कंदकुज नव्हती कीड व रोगप्रादुर्भावहो कमी असल्याचे सांगितले. आचार्य पदवीसाठीची विद्यार्थींनी काजल यांनीही सहभाग नोंदवला व पीडीकेव्ही वायगाव या वाणाचा अभ्यास करून संशोधन प्रबंध तयार केला जात असल्याचे व याकामी केंद्राचे सहकार्य लाभले असे सांगितले.

संशोधन केंद्राच्या वतीने केलेल्या विनंतीवरून गोदावरी समुहाच्या सन्माननीय अध्यक्षा सौ राजश्रीताई पाटील यांनी बहुमोल मार्गदर्शन केलं. अजय सरसमकर यांनी केंद्राच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक केले . या माध्यमातून दर्जेदार हळद बेण्याची उपलब्धता वाढेल तसेच सन्माननीय ना. हेमंतभाऊ पाटील यांच्या संकल्पनेतील हा प्रकल्प लवकरच कार्यान्वित होईल व हळद उत्पादक शेतकऱ्यांना त्याचा लाभ मिळेल असे सांगितले.संचालक सदाशिवराव पुंड यांनीही सहभाग नोंदवला.

# अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परसह १५.१० लाखांचा मुद्देमाल जप्त: नंदगाव शिवारात कारवाई, औंढा नागनाथ पोलिसात गुन्हा दाखल

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यातील औंढा नागनाथ तालुक्यात असलेल्या नंदगाव शिवारात पोलिसांच्या पथकाने राबविलेल्या वाहन तपासणी मोहिमेत अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या टिप्परसह १५.१० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी टिप्पर चालका विरुध्द बुधवार दि.२५ फेब्रुवारी रोजी औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, हिंगोली जिल्ह्यातील वाळू घाटावरून अवैधरित्या वाळू उपसा करून वाहतू करणाऱ्या वाहनांवर कारवाईची मोहिम अधिक गतीमान केली आहे. त्यानुसार जिल्ह्यातील १३ पोलिस ठाण्यांनी या कारवाईसाठी विशेष पथक स्थापन केले आहे. यामध्ये प्रामुख्याने वाळू घाट असलेल्या हिंगोली ग्रामीण, नर्सी,सेनगाव, आखाडा बाळापूर, औंढा नागनाथ, वसमत शहर व वसमत ग्रामीण पोलिस ठाण्यांच्या पथकाचा समावेश आहे. या वाळू घाटाकडे जाणाऱ्या मार्गावर दररोज वाहन तपसाणी करण्याचे आदेश पोलिस अधिक्षक निलाभ रोहन यांनी दिले आहेत.

दरम्यान, औंढा नागनाथ तालुक्यातील सिध्देश्वर ते नंदगाव मार्गावर एका टिप्परमध्ये अवैधरित्या वाळू वाहतूक केली जात असल्याची माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यावरून पोलिस निरीक्षक जी.एस. राहिरे, उपनिरीक्षक दत्ता कानगुले, श्रीधर वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली जमादार किशोर पारिसकर, रवीकांत हरकाळ यांच्या पथकाने बुधवार दि.२५ फेब्रुवारी रोजी वाहन तपासणी सुरु केली.

यावेळी एक टिप्पर पोलिसांनी थांबवून चालक गंगाधर लडके (रा. औंढा नागनाथ) याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवी उडवीची उत्तरे दिली. त्याच्याकडे वाळू वाहतूकीच्या यावेळी एक टिप्पर पोलिसांनी थांबवून चालक गंगाधर लडके (रा. औंढा नागनाथ) याच्याकडे चौकशी केली असता त्याने उडवी उडवीची उत्तरे दिली. त्याच्याकडे वाळू वाहतूकीच्या पावत्या तसेच परवाना नसल्याचे लक्षात आल्यानंतर पोलिसांनी टिप्पर व वाळू असा १५.१० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणी जमादार पारीसकर यांच्या तक्रारीवरुन गंगाधर लडके याच्या विरुद्ध औंढा नागनाथ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. जमादार रविकांत हरकाळ पुढील तपास करीत आहेत.

# भोंग्यावरून बारावी परीक्षेची उत्तरे सांगितल्याचा धक्कादायक प्रकार; अज्ञाताविरुद्ध गुन्हा

*** आत्ताच एक्सप्रेस**
**लक्ष्मीकांत मुंडे**



**किनवट –** नांदेड जिल्ह्यातील किनवट तालुक्यातून शिक्षण व्यवस्थेला हादरा देणारी गंभीर घटना समोर आली आहे. बारावीच्या परीक्षेदरम्यान चक्क भोंग्यावरून प्रश्नांची उत्तरे सांगितली जात असल्याचा प्रकार उघडकीस आला असून या प्रकरणी अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

किनवट तालुक्यातील दहेली तांडा येथील स्व. संगीतादेवी उच्च माध्यमिक विद्यालय आश्रमशाळा येथे बारावीचे परीक्षा केंद्र सुरू आहे. बुधवारी दुपारी सुमारे दोन वाजताच्या सुमारास परीक्षा सुरू असताना केंद्राच्या संरक्षण भिंतीलगत असलेल्या प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जुन्या इमारतीवर भोंगा लावून एमसीक्यू स्वरूपातील वस्तुनिष्ठ प्रश्नांची उत्तरे मोठ्याने सांगितली जात असल्याचे निदर्शनास आले.

हा प्रकार लक्षात येताच उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा केंद्र क्रमांक २०७ चे केंद्र संचालक सुबोध थोरात यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. तसेच पोलीस व संबंधित यंत्रणांना माहिती देण्यात आली. मात्र तोपर्यंत भोंगा लावणारी व्यक्ती घटनास्थळावरून पसार झाली होती.

या घटनेमुळे परीक्षेच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून प्रामाणिक विद्यार्थ्यांमध्ये नाराजीचे वातावरण आहे. केंद्र संचालक सुबोध थोरात यांच्या फिर्यादीवरून सिंदखेड पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# महाराष्ट्र भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीतशरद पवार गटाचे नेते आतिश जयप्रकाश दांडेगावकर यांचा भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हिंगोली जिल्ह्यातील राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे मातब्बर नेते, माजी सहकार मंत्री जयप्रकाश दांडेगावकर यांचे सुपुत्र आतिश जयप्रकाश दांडेगावकर यांनी आज मुंबई येथे हजारो समर्थकासह भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या प्रमुख उपस्थितीत भाजपामध्ये प्रवेश केला त्यांच्या या प्रवेशाने हिंगोली जिल्ह्यातील राजकारणाला कलाटणी मिळाली असून आता तिन्ही विधानसभा मतदारसंघावर भाजपाची ताकद वाढली आहे.




राष्ट्रविकास, सक्षम नेतृत्व व लोककल्याणाच्या विचारांवर विश्वास ठेवत भाजप परिवारात झालेला हा प्रवेश निश्चितच संघटनबळ वाढवणारा ठरेल. नव्या सहकाऱ्यांचे भाजप परिवारात मनः पूर्वक स्वागत असे मत व्यक्त केले.

यावेळी हिंगोली जिल्ह्यातून हिंगोली विधानसभेचे आमदार तानाजीराव मुटकुळे पाटील,भाजपा जिल्हाध्यक्ष माजी आमदार गजाननराव घुगे, आमदार प्रज्ञाताई सातव, माजी आमदार रामराव वडकुते, नांदेड भाजपा जिल्हाध्यक्ष किशोरजी देशमुख, खोबराजी नरवाडे, मिलिंद यंबल,शिवदास बोडेवार, अंकुश आहेर, डॉ. अवधूत शिंदे, ज्ञानेश्वर गुंजाळ, विष्णू बोचकरी व सर्व हिंगोली जिल्ह्यातील भाजपा कार्यकर्ते उपस्थित होते.

प्रवेश केलेले खालील प्रमाणे

दौलतराव हुंबाड, रमेश सानप, गणेश कमलु, विजय कडतन, रत्नमाला शिंदे, स्वप्निल मुळे, शंकरराव इंगोले, राम झुंजुर्डे, प्रल्हादराव सावंत, अमोल मुळे, नितीन महागावकर, चंद्रमुनी मस्के, राजाभाऊ भालेराव, एम.डी.अंभोरे व वसमत विधानसभा मतदारसंघातील अनेक कार्यकर्त्यांनी प्रवेश केला आहे.

# राज्य शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांची चित्ररथाद्वारे जनजागृती

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) सन २०२५-२०२६ अंतर्गत जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून विविध विभागाच्या कल्याणकारी विविध योजनांची जिल्ह्यातील लाभार्थ्यांना माहिती देण्यासाठी व्यापक जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.

आज हिंगोली जिल्ह्यातील माथा, रुपूर, करवाडी, असोला तर्फे, गोळेगाव, भोसी आदी गावामध्ये चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून विविध विभागाच्या कल्याणकारी योजनांची जनजागृती करण्यात आली. या चित्ररथाच्या माध्यमातून विविध योजनांची माहिती मिळण्यास मदत होणार आहे.

हिंगोली जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेला शासनाच्या कल्याणकारी योजनांची माहिती व्हावी आणि त्यांना या योजनेचा लाभ घेता यावा, यासाठी चित्ररथ आणि भित्तीपत्रिकाच्या माध्यमातून व्यापक जनजागृती करण्यात येत आहे. याचा लाभ नागरिकांनी घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.




# सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता दि.गि. पोतरे यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** सार्वजनिक बांधकाम विभाग हिंगोली चे कार्यकारी अभियंता दि.गि. पोतरे हे आज वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले त्यानिमित्ताने सार्वजनिक बांधकाम विभाग येथे त्यांच्या सेवानिवृत्ती निमित्त सत्काराच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सार्वजनिक बांधकाम मंडळ नांदेड अधीक्षक अभियंता सु.न.धोत्रे, सुदेश देशमुख उप अभियंता वसमत,अनिल केंद्रे शाखा अभियंता यांत्रिकी, मिलिंद छिद्रावर, कतलेवाड, उप कार्यकारी अभियंता शिंदे सर्व अधिकारी कर्मचारी तसेच शासकीय गुत्तेदार यांच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.




# मागासवर्गीयांसाठी व्यवसाय अनुदान योजना; १० मार्चपर्यंत अर्ज करण्याचे आवाहन

**नांदेड –** जिल्हा परिषद, नांदेड अंतर्गत समाज कल्याण विभागामार्फत मागासवर्गीय बांधवांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येत आहेत. त्यामध्ये जिल्हा परिषद २०टक्के सेस अंतर्गत खालील अर्थसहाय्याच्या योजना कार्यान्वित आहेत.

**योजना प्रकार :**

मागासवर्गीयांना व्यवसायासाठी अनुदान, मागासवर्गीय महिलांना व्यवसायासाठी अनुदान, प्रती लाभार्थी कमाल ४० हजार रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येणार आहे. प्रत्यक्ष खर्च कमी झाल्यास पावतीनुसार अनुदान देय राहील.

**अटी व शर्ती :**

योजना ग्रामीण भागातील (अ.जा./अ.ज./विजाभज) प्रवर्गातील पुरुष व महिलांसाठी स्वतःचा व्यवसाय उभारण्यासाठी आहे. लाभार्थी ग्रामीण भागातील असावा. वय १८ ते ५० वर्षे दरम्यान असावे. वार्षिक उत्पन्न १ लाख रुपयांपेक्षा जास्त नसावे. सक्षम प्राधिकाऱ्यांनी निर्गमित केलेले मूळ जात प्रमाणपत्र आवश्यक आहे. रहिवासी प्रमाणपत्र बंधनकारक आहे. उद्योगासाठी ग्रामपंचायतीचे नाहरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. व्यवसायासाठी स्वतःची जागा असावी. भाड्याची जागा असल्यास भाडेकरार व पावती आवश्यक. अंतिम निवडीचे अधिकार विषय समिती/प्रशासनाकडे राहतील. लाभार्थ्याने जिल्हा परिषदेच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा. व्यवसाय सुरू केल्याचे प्रमाणपत्र ग्रामसेवक/ग्रामपंचायत अधिकारी/विस्तार अधिकारी (पंचायत समिती) यांचेकडून घेणे आवश्यक राहील.

**अर्ज प्रक्रिया :**

पात्र लाभार्थ्यांनी : Website : mhdivyang.com संकेतस्थळावर नोंदणी करावी, त्यानंतर परिपूर्ण अर्ज पंचायत समितीमार्फत जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयात १० मार्च २०२६ पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावेत. विहित मुदतीनंतर प्राप्त अर्जांचा विचार केला जाणार नाही, असे आवाहन जिल्हा समाज कल्याण अधिकारी सतेंद्र वीरेंद्र आऊलवार यांनी केले आहे.

# हिंदू सुरक्षा सेवा संघ हिंगोली जिल्ह्याची कळमनुरी येथे आढावा बैठक संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** मुख्य संरक्षक मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांच्या आशिर्वादाने राष्ट्रीय अध्यक्ष राजुदासजी महाराज मंहत हनुमान गढी अयोध्या यांचा मार्च ते एप्रिल महिन्यात हिंदू महासम्मेंलन व ईतर विषयात महाराष्ट्र भर दौरे होणार आहेत त्या अनुषंगाने हिंगोली येथे जिल्ह्यातील सर्वच हिंदू सुरक्षा सेवा संघाच्या महत्त्वाच्या पदाधिकारी यांची आज दिनांक २६/०२/२६ गुरुवारी शासकीय विश्रामगृह कळमनुरी येथे बैठक पार पडली.



या बैठकीला हिंदू सुरक्षा सेवा संघ जिल्हाध्यक्ष तथा प्रदेश कार्यवाह महामंत्री संदिप वाकडे सरकार, जिल्हा उपाध्यक्ष गोविंद बेद्रे पाटील, भवरजी पाटील, महामंत्री शिवाजी उघडे, कळमनुरी शहराध्यक्ष जिद्दी पाटील, तालुकाध्यक्ष अशोकराव मस्के, वसमत तालुकाध्यक्ष अर्जुन बेंडे पाटील, कळमनुरी युवा तालुकाध्यक्ष सोपान घुगे, बाळापुर अध्यक्ष गोविंद भिवकर ,वसमत उपाध्यक्ष मंगेश पांचाळ व ईतर पदाधिकारी उपस्थित होते.

हिंदू सुरक्षा सेवा संघ मार्फत दिनांक ०८/०३/२६ ला रविवारी रोजी अकोला येथे प्रदेशाची आढावा बैठक होणार आहे. या बैठकीत महाराष्ट्राचे हिंदू सुरक्षा सेवा संघ - संत प्रकोष्ठ, युवा प्रकोष्ठ - महिला प्रकोष्ठ - विधी आघाडी ,अध्यात्मिक आघाडी ,व वैद्यकीय प्रकोष्ठ ( डॉक्टर सेल ) चे सर्व जिल्ह्यातील पदाधिकारी उपस्थित रहाणार आहेत त्या अनुषंगाने आजची बैठक पार पडली.

# हिंगोली सराफा बाजारातील हनुमान मंदिराचे जीर्णोद्धाराचे काम रखडले; भाविकांची गैरसोय, लोकप्रतिनिधी लक्ष देणार का?

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** शहरातील अत्यंत गजबजलेल्या आणि श्रद्धेचे स्थान असलेल्या सराफा बाजार परिसरातील प्राचीन हनुमान मंदिराच्या जीर्णोद्धाराचे काम मागील अनेक दिवसांपासून सुरू करण्यात आले होते. मात्र, अत्यंत खेदाची बाब म्हणजे सध्या हे काम पूर्णपणे बंद पडले असून, याचा मोठा फटका भाविकांना आणि परिसरातील नागरिकांना बसत आहे.



**बाहेरूनच घ्यावे लागतेय दर्शन**

मंदिराचे काम अर्धवट अवस्थेत असल्याने भाविकांना गाभाऱ्यात प्रवेश मिळणे कठीण झाले आहे. श्रद्धेपोटी येणाऱ्या शेकडो भाविकांना भर उन्हात बाहेरूनच दर्शन घेऊन परतावे लागत आहे. मंदिराच्या परिसरात बांधकामाचे साहित्य अस्ताव्यस्त पडलेले असल्याने येण्या-जाणाऱ्या नागरिकांनाही नाहक मनस्ताप सहन करावा लागत आहे.

**नागरिकांची मागणी: काम तात्काळ पूर्ण करा**

परिसरातील व्यापारी आणि रहिवाशांच्या म्हणण्यानुसार, हे काम लवकरात लवकर पूर्ण होणे अपेक्षित होते, परंतु सध्या कोणतीही हालचाल होताना दिसत नाही. ‘‘आमचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिराचे काम का थांबले आहे?‘‘ असा सवाल आता नागरिक उपस्थित करत आहेत.

**आमदार आणि नगरपालिकेकडे डोळे लावून बसलेत भाविक**

या गंभीर समस्येकडे स्थानिक लोकप्रतिनिधी (आमदार) आणि नगरपालिका प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे. रखडलेला निधी किंवा तांत्रिक अडचणी दूर करून हे काम युद्धपातळीवर पूर्ण करावे, जेणेकरून भाविकांना सुलभ दर्शन घेता येईल, अशी आग्रही मागणी परिसरातील नागरिकांकडून केली जात आहे.

# दहावीचा इंग्रजीचा पेपर जिल्ह्यातील सर्व १७८ केंद्रांवर सुरळीत-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

**आत्ताच एक्सप्रेस**

**नांदेड –** आज इयत्ता १० वीची परीक्षा जिल्ह्यातील १७८ केंद्रांवर सुरळीत पार पडली. इंग्रजी विषयाच्या पेपरसाठी एकूण ४८,८३२ परीक्षार्थ्यांपैकी ४७,७२५ परीक्षार्थी उपस्थित होते. उपस्थितीची टक्केवारी ९७.७३ इतकी नोंदविण्यात आली.

प्रत्येक केंद्रावर बैठे पथकांमार्फत झूम वेबकास्टद्वारे तसेच ड्रोन आणि व्हिडिओ कॅमेराच्या सहाय्याने पूर्णवेळ नियंत्रण ठेवण्यात आले. त्यामुळे सर्व १७८ परीक्षा केंद्रांवर परीक्षा सुरळीत व कॉपीमुक्त वातावरणात पार पडली.

आजच्या इंग्रजीच्या पेपरसाठी जिल्हास्तरावरील सुमारे ६६ अधिकारी ६६ परीक्षा केंद्रांवर पूर्णवेळ उपस्थित होते. तसेच शिक्षण विभागाचे ७ अधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी, केंद्रप्रमुख व तालुकास्तरावरील अधिकारी अशा एकूण ११२ अधिकाऱ्यांनी भरारी पथकांमार्फत सर्व १७८ केंद्रांना भेट देऊन उपस्थिती नोंदविली. त्यामुळे परीक्षा प्रक्रिया काटेकोरपणे राबविण्यात आली.

दरम्यान, जिल्हा परिषद हायस्कूल, बेटमोगरा ता. मुखेड येथील केंद्रावर एका परीक्षार्थ्याच्या जागी तोतया परीक्षार्थी उपस्थित असल्याचे भरारी पथक प्रमुख जिल्हा नियोजन अधिकारी अर्जुन झाडे यांच्या निदर्शनास आले. संबंधिताविरुद्ध मंडळ नियमावली तसेच भारतीय न्यायसंहिता कलम १६३ आणि महाराष्ट्र गैरप्रकार अधिनियम १९८२ अन्वये कारवाई करण्यात येत आहे. इयत्ता १० वी व १२ वीच्या सर्व परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पाडण्यासाठी प्रशासन कटिबद्ध आहे. यासाठी विद्यार्थी व पालकांनी सकारात्मक सहकार्य करावे. तसेच यापुढील सर्व परीक्षांमध्ये तोतया परीक्षार्थी आढळू नयेत यासाठी परीक्षा प्रक्रियेशी संबंधित सर्व घटकांनी विशेष दक्षता घ्यावी आणि प्रत्येक परीक्षार्थ्याची ओळख पडताळूनच परीक्षा दालनात प्रवेश द्यावा, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.

# शिवसेनेचे युवानेते करण एंड्रलवार यांचा वाढदिवस जल्लोषात साजरा; अन्नदान-रक्तदान शिबिरांना उदंड प्रतिसाद













* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – गोरगरिबांचे आधारस्तंभ, तरुणांचे प्रेरणास्थान आणि तडफदार नेतृत्व म्हणून ओळख असलेले शिवसेनेचे युवानेते करण एंड्रलवार यांचा वाढदिवस किनवट शहरात उत्साह, जल्लोष आणि सामाजिक बांधिलकीच्या वातावरणात साजरा करण्यात आला. वाढदिवसानिमित्त आयोजित विविध सामाजिक उपक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून दिवसभर विविध क्षेत्रातील मान्यवर, कार्यकर्ते, युवक व नागरिकांनी हार-तुरे घेऊन नगरपरिषद कार्यालयात येत अभिष्टचिंतनासाठी अलोट गर्दी केली होती. प्रत्येक जाती-धर्मातील नागरिकांनी प्रत्यक्ष भेटून दिलेल्या शुभेच्छांमुळे आपण भारावून गेलो असून जनतेचे प्रेम हीच माझ्या कार्याची खरी पावती आहे; शेवटच्या श्वासापर्यंत सर्वसामान्य व गरजू जनतेच्या कल्याणासाठी निस्वार्थपणे काम करत राहीन, असे भावनिक उद्गार करण एंड्रलवार यांनी व्यक्त केले.

दि. २७ फेब्रुवारी रोजी सकाळी त्यांनी कुटुंबासह अय्यप्पा स्वामी मंदिरात विधिवत पूजा-अर्चना करून दर्शन घेतले. त्यानंतर संत गाडगेबाबा जयंती सोहळ्यात सहभाग घेत त्यांनी सामाजिक संदेश दिला. पुढे संथागार वृद्धाश्रम, करण टेन्ट हाऊस, शुभम हजबे अमन हॉटेल आणि विशाल गुरु स्वामी प्रॉपर्टी येथे वाढदिवसानिमित्त कार्यक्रम पार पडले.

सकाळी ११ वाजता शिवसेनेचे शहरप्रमुख प्रशांत कोरडे व माजी शहरप्रमुख संतोष यलचलवार यांच्या उपस्थितीत नगरपरिषद कार्यालयासमोर आयोजित भव्य रक्तदान शिबिरस्थळी करण एंड्रलवार यांचे पारंपरिक घुसाडी नृत्य सादर करून व टोप घालून जंगी स्वागत करण्यात आले. आदिवासी युवानेते केशव कराळे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. नगराध्यक्ष सुजाता विनोद एंड्रलवार यांच्या हस्ते फीत कापून शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या रक्तदान शिबिराला उदंड प्रतिसाद मिळाला असून शेकडो कार्यकर्त्यांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. नांदेड येथील नंदिग्राम ब्लड बँक तसेच गुरुगोविंदसिंगजी ब्लड सेंटर येथील डॉक्टर व कर्मचाऱ्यांनी रक्त संकलन केले. त्यानंतर नगरपरिषद कार्यालयात मुख्याधिकारी मुगाजी काकडे व कार्यालयीन अधीक्षक अशोक भालेराव यांनी नगरपरिषदेच्या वतीने करणभाऊंचा सत्कार करून केक भरवून अभिष्टचिंतन केले.

वाढदिवसानिमित्त बसस्थानक परिसरात बाबूसिंग जाटवे यांनी अन्नदान कार्यक्रम आयोजित केला होता, तर खैरोद्दीन मार्ग येथे शेख जावेद यांनी इफ्तार पार्टीचे आयोजन करून सामाजिक सलोखा दृढ करण्याचा संदेश दिला. वाढदिवसाचा केवळ जल्लोष न करता सामाजिक उपक्रमांवर भर द्यावा, या करणभाऊंच्या सूचनेनुसार कार्यकर्ते व हितचिंतकांनी सेवा कार्यात सक्रिय सहभाग नोंदविला.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते कैलास गोरठेकर पाटील, शिवसेनेचे विधानसभा संपर्कप्रमुख दयाल गिरी, जिल्हाप्रमुख ज्योतिबा दादा खराटे, तालुका प्रमुख मारोती दिवसे पाटील, युवासेना जिल्हाप्रमुख ॲड. यश खराटे, त्रिशूल पाटील, अमरदीप कदम, शेखर नेम्मानीवार, राम नेम्मानिवार, प्रवीण राठोड, अभय महाजन, मारोती मुनेश्वर आदींसह राजकीय व सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांनी प्रत्यक्ष भेट देऊन तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या. ''करणभाऊ एंड्रलवार यांचे नेतृत्व सर्वसामान्यांच्या प्रश्नांना वाचा फोडणारे आहे,'' अशा शब्दांत त्यांच्या कार्याचे कौतुक करण्यात आले.

शहरात ठिकठिकाणी लावण्यात आलेले भव्य शुभेच्छा फलक नागरिकांचे लक्ष वेधून घेत होते. वाढदिवस कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिवा तीरमनवार, साई नेमानीवार, राजू जोशी, राकेश गणोजवार, शैलेश बेलसरवार, संतोष तक्कलवार, सुनील तक्कलवार, महेश मंडारे, विकास गंनोजवार, मोहक पांचाळ, साहिल तिरमनवार, निशांत बोलेनवार, मुकेश बिराजदार, संजय धोबे, प्रवीण रेड्डी, बालाजी मेश्राम, शेषराव गादेवार, दशरथ जेवलेवाड, चिंटू पिंनमवार, रितेश मंत्री, प्रभू कोल्हे, अनवर मिर्झा, मनीष ताडपेल्लीवार, आदर्श जागरलावार, मुन्ना पठाण, नईम खान, शेख माजीद आदींनी विशेष परिश्रम घेतले. सामाजिक बांधिलकी, सर्वसमावेशकता आणि जनसेवेचा संदेश देणारा करण एंड्रलवार यांचा वाढदिवस किनवट शहरासाठी प्रेरणादायी ठरला.



**पोलीस उप महानिरीक्षक शहाजी उमाप यांच्या मार्गदर्शनाखालील पथकाने अनेक ठिकाणी धाडी टाकून ऐवैदरीत्या वाळूचा साठा ठेवून चोरटी वाहतूक करणाऱ्या वाहनासह जेसीबी रोख रक्कम असा दस्तऐवज जप्त केला आहे या धाडसी कामगिरीमुळे अवैध वाळू तस्करी करणाऱ्यांची त्रेधा धांदल उडाली आहे.**

# तांत्रिक गोंधळामुळे दोन हजार घरकुल लाभार्थ्यांचे हप्ते रखडले; गोरगरिबांची घरकुल बांधकामे रखडली

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – किनवट तालुक्यात घरकुल मंजूर झालेल्या लाभार्थ्यांना तांत्रिक अडचणींचा मोठा फटका बसला असून सुमारे दोन हजार लाभार्थ्यांचे हप्ते रखडल्याने त्यांच्या स्वप्नातील घरकुल योजना अर्धवट अवस्थेत अडकली आहे. निधी वेळेवर न मिळाल्यामुळे अनेकांनी सुरू केलेली बांधकामे ठप्प झाली असून काही कुटुंबांना तात्पुरत्या निवाऱ्यात किंवा उघड्यावर राहण्याची वेळ आली आहे. घरकुल मंजूर झाल्यानंतर अनेक लाभार्थ्यांनी जुन्या झोपड्या व कच्ची घरे पाडून नवीन बांधकाम सुरू केले; मात्र निधी वितरण प्रक्रियेत 'एफटीओ' रिजेक्ट झाल्याने हप्ते खात्यात जमा झाले नाहीत. परिणामी लाभार्थ्यांना पंचायत समिती व संबंधित कार्यालयांच्या वारंवार चकरा माराव्या लागत असून ठोस मार्गदर्शनाऐवजी तांत्रिक कारणे सांगितली जात असल्याची तक्रार आहे.




तालुक्यातील सुमारे ७९६ लाभार्थ्यांचा पहिला हप्ता तर १,१३२ लाभार्थ्यांचा दुसरा हप्ता रखडल्याने बांधकामे अर्धवट राहिली आहेत. बांधकाम साहित्य पुरवठादारांचे देणे बाकी राहिले, मजुरांचे पैसे थकले आणि अनेक कुटुंबांवर कर्जाचा भार वाढला आहे. तपासणीत आधार कार्ड बँक खात्याशी लिंक नसणे, डीबीटी पडताळणीतील त्रुटी, एफटीओ रिजेक्ट होणे, खात्यात व्यवहार नसल्याने खाते निष्क्रिय ठरणे, जनधन खात्यांच्या व्यवहार मर्यादा तसेच नाव व माहितीतील विसंगती यांसारख्या तांत्रिक अडचणी समोर आल्या आहेत. प्रशासनिक चूक नसली तरी लाभार्थ्यांच्या स्तरावरील तांत्रिक त्रुटींमुळे निधी अडकल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, अनेकांनी घर मोडून बांधकाम सुरू केले असताना अचानक झालेल्या पावसामुळे अर्धवट बांधकामात पाणी साचले असून कुटुंबांना रात्री जागून काढाव्या लागत आहेत. लहान मुले, महिला व वृद्धांचे हाल होत असून काही ठिकाणी ताडपत्री लावून राहण्याची वेळ आली आहे. ''घरकुल मंजूर झाले म्हणून जुने घर पाडले; पण निधीच मिळत नसल्याने आता राहायचे कुठे?'' असा सवाल संतप्त लाभार्थी उपस्थित करीत आहेत. वारंवार पाठपुरावा करूनही निधी न मिळाल्याने लाभार्थ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

गटविकास कार्यालयाकडून डीबीटी रि-ॲक्टिव्हेशन प्रक्रिया सुरू असून तांत्रिक त्रुटी दुरुस्त झाल्यानंतर निधी जमा केला जाईल, असे सांगण्यात आले आहे. लाभार्थ्यांनी आधार लिंकिंग, बँक तपशील पडताळणी व आवश्यक कागदपत्रे अद्ययावत करावीत, असेही आवाहन करण्यात आले आहे. ग्रामीण गरीबांसाठी घरकुल योजना आशेचा किरण मानली जात असली तरी तांत्रिक प्रक्रियेतील अडथळ्यांमुळे लाभार्थ्यांचे जीवन संकटात सापडले आहे. प्रशासनाने विशेष मोहीम राबवून सर्व त्रुटी तत्काळ दूर कराव्यात व रखडलेले हप्ते त्वरित जमा करावेत, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# श्री गुरु गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत ''राष्ट्रीय विज्ञान दिन'' उत्साहात साजरा

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड** – भारताचे महान भौतिकशास्त्रज्ञ सी. व्ही. रमण यांनी २८ फेब्रुवारी १९२८ रोजी 'रमण परिणाम' हा महत्त्वपूर्ण शोध लावला. प्रकाशकिरणांचा पदार्थांशी होणारा परस्परसंवाद आणि त्यातून निर्माण होणाऱ्या विकिरणाचा अभ्यास हा या शोधाचा गाभा होता. या अद्वितीय संशोधनासाठी त्यांना १९३० मध्ये भौतिकशास्त्रातील नोबेल पारितोषिक प्रदान करण्यात आले. विज्ञान क्षेत्रात नोबेल पारितोषिक मिळवणारे ते पहिले भारतीय शास्त्रज्ञ ठरले.

विज्ञानाचे महत्त्व समाजापर्यंत पोहोचावे आणि विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन वाढावा या उद्देशाने भारत सरकारने १९८६ साली २८ फेब्रुवारी हा दिवस ''राष्ट्रीय विज्ञान दिन'' म्हणून घोषित केला. तेव्हापासून हा दिवस देशभर विविध उपक्रमांद्वारे उत्साहात साजरा केला जातो. यंदाच्या राष्ट्रीय विज्ञान दिनाची थीम '' : (विज्ञानातील महिला विकसित भारताची प्रेरक शक्ती)'' अशी निश्चित करण्यात आली आहे. विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील महिलांच्या योगदान व नेतृत्वाचा गौरव हा या थीमचा केंद्रबिंदू आहे.





त्या अनुषंगाने श्री गुरू गोबिंदसिंघजी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, नांदेड येथे २७ फेब्रुवारी २०२६ रोजी ''राष्ट्रीय विज्ञान दिन'' उत्साहात साजरा करण्यात आला. कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे व वक्ते म्हणून लेखक व समीक्षक शिवाजीराजे पाटील उपस्थित होते. तसेच संस्था व्यवस्थापन समितीचे सदस्य धिरज बीडवे, संस्थेचे प्राचार्य श्री कंदलवाड व्ही. डी., सर्व कर्मचारी व प्रशिक्षणार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने झाली. संस्थेतील शिल्प निदेशिका सौ. हिसवनकर एम. आर. यांनी प्रास्ताविक करताना डॉ. सी. व्ही. रमण यांच्या जीवनचरित्रावर प्रकाश टाकला व विज्ञानाचे महत्त्व अधोरेखित केले. प्रमुख वक्ते शिवाजीराजे पाटील यांनी दैनंदिन जीवनातील विज्ञानाचे स्थान स्पष्ट करत प्रेरणादायी मार्गदर्शन केले. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून त्यांनी प्रशिक्षणार्थ्यांशी खेळीमेळीचा संवाद साधला. प्रशिक्षणार्थ्यांनीही उत्स्फूर्त प्रतिसाद देत कार्यक्रमात सक्रिय सहभाग नोंदविला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पोतदार डी. ए. (रा. से. योजना कार्यक्रमाधिकारी) यांनी केले. प्राचार्य श्री कंदलवाड व्ही. डी. यांनी आभार प्रदर्शन केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेतील सर्व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले.

# प्रा.रामप्रसाद तौर यांना 'विद्रोही जीवन गौरव'चा मान

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**



**किनवट** – मराठी साहित्यातील ज्येष्ठ समीक्षक आणि सत्यशोधक विचारांचे सातत्याने संवर्धन करणारे प्रा. रामप्रसाद तौर यांना यंदाचा 'विद्रोही जीवन गौरव पुरस्कार' जाहीर झाला आहे. किनवटसारख्या बंजारा व आदिवासी बहुल, दुर्गम भागात राहून शिक्षण आणि सामाजिक प्रबोधनाची अखंड साधना करणाऱ्या या व्यक्तिमत्त्वाचा हा सन्मान मानला जात आहे.

प्रा. तौर यांनी १९८७ पासून बळीराम पाटील महाविद्यालयाच्या माध्यमातून ज्ञानदानाचे कार्य हाती घेतले. चार दशकांहून अधिक काळ त्यांनी हजारो विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक मार्गदर्शनच नव्हे, तर जीवनमूल्यांची शिकवण दिली. आर्थिक, सामाजिक अडचणींनी ग्रासलेल्या विद्यार्थ्यांना उभारी देत त्यांच्यात आत्मविश्वास जागवण्याचे काम त्यांनी निष्ठेने केले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली घडलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रांत यशस्वीपणे कार्यरत आहेत.

किनवट या अत्यंत मागासलेल्या तालुक्यात सत्यशोधक विचारांचे बीजारोपण करून सामाजिक चैतन्य निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही त्यांनी केले. वंचित, उपेक्षित घटकांसाठी आवाज उठवणे, अन्यायाविरुद्ध भूमिका घेणे आणि समाजमनात विवेकाची ज्योत प्रज्वलित ठेवणे ही त्यांची ओळख बनली आहे. साहित्य, सामाजिक चळवळ आणि शैक्षणिक कार्य यांचा सुंदर संगम त्यांच्या कार्यात दिसून येतो. त्यांच्या या बहुआयामी योगदानाची दखल घेत आज (ता.२८) नांदेड येथे आयोजित २० व्या विद्रोही मराठी साहित्य संमेलनात मान्यवरांच्या हस्ते त्यांना 'विद्रोही जीवन गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे. हा पुरस्कार म्हणजे आयुष्यभर रंजल्या-गांजल्यांसाठी केलेल्या सेवेचा, अडचणीत सापडलेल्यांना दिलेल्या आधाराचा आणि समाजप्रबोधनासाठी झटलेल्या अथक परिश्रमांचा गौरव आहे. किनवटच्या शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रासाठी त्यांनी पेटवलेला ज्ञानदीप आगामी पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरत राहील, अशी भावना सर्व स्तरांतून व्यक्त होत आहे.

# सण-उत्सव काळात धार्मिक सौहार्द बिघडविणाऱ्यांची गय नाही

## शांतता समिती बैठकीत पोलीस निरीक्षक गणेश कराड यांचा कडक इशारा

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासन सज्ज असून सामाजिक व धार्मिक सौहार्द बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात येईल, असा सज्जड इशारा किनवट पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक गणेश कराड यांनी दिला. ''सण हे आनंद, ऐक्य आणि बंधुभावाचे प्रतीक आहेत; शांतता भंग करणाऱ्याचा कोणताही मुलाहिजा केला जाणार नाही,'' असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले.

मुस्लिम बांधवांचा पवित्र रमजान महिना तसेच आगामी सण-उत्सव काळ शांततेत पार पडावेत, या उद्देशाने उपविभागीय पोलीस अधिकारी रामकृष्ण मळघणे यांच्या मार्गदर्शनाखाली बुधवारी किनवट पोलीस ठाण्यात शांतता समितीची बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीत बोलताना पोलीस निरीक्षक कराड यांनी नागरिकांना जबाबदारीने वागण्याचे आवाहन करत, अफवा, उत्तेजक वक्तव्ये आणि सामाजिक तेढ निर्माण करणाऱ्या कृतींपासून दूर राहण्याचे आवाहन केले.

सोशल मीडियावर अफवा पसरवणाऱ्या पोस्टवर सायबर सेलचे बारीक लक्ष राहणार असून कोणतीही संशयास्पद माहिती पडताळणीशिवाय फॉरवर्ड करू नये, असा इशारा देण्यात आला. तसेच उत्सवादरम्यान ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करणे बंधनकारक असून ठराविक वेळेनंतर लाऊडस्पीकर वापरण्यास परवानगी दिली जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले.

नगर परिषदेच्या सहकार्याने शहरातील मोकाट जनावरांच्या प्रश्नावर नियंत्रण आणण्यासाठी उपाययोजना करण्यात येतील, तसेच अवैध धंद्यांवर कठोर कारवाई करण्यास पोलीस प्रशासन सज्ज असल्याचे कराड यांनी सांगितले. कोणतीही आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास नागरिकांनी तातडीने पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा; ''फोन करा, मी स्वतः घटनास्थळी हजर होईन,'' असे आश्वासनही त्यांनी दिले.

यावेळी माजी नगराध्यक्ष हाजी ईसाखान सरदार खान व ज्येष्ठ नेते राघू मामा यांनी आपल्या मनोगतातून किनवट शहर व तालुक्यात वर्षानुवर्षे जोपासली गेलेली हिंदू-मुस्लिम ऐक्याची परंपरा अधोरेखित करत सर्वांनी शांतता व बंधुभाव टिकवून ठेवण्याचे आवाहन केले. बैठकीला शांतता समिती सदस्य, विविध राजकीय पक्षांचे



पदाधिकारी, सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी, प्रतिष्ठित नागरिक व पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते. आगामी सण शांततेत, सौहार्दपूर्ण वातावरणात आणि परस्पर सहकार्याने साजरे करण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813